**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक १७ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम राहणार**

2. **कर प्रशासनातील गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये आयकर अधिकाऱ्यांनी देशहित समोर ठेवून काम करावं असं महालेखाकार आणि नियंत्रक के संजय मूर्ति यांचं आवाहन**

3. **ऑस्कर नामांकनाच्या निवडक १५ चित्रपटांमधे होमबाऊंड या भारतीय चित्रपटाचा समावेश**

4. **विदर्भात गोंदिया इथं सातत्याने निचांकी तापमानाही नोंद, आजही पारा ८ पूर्णांक ६ अंशावर**

---------------------------------------------

**मंत्रिमंडळ निर्णय**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. यानुसार  राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज  स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ काढण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली. याशिवाय, राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा

निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसंच महाराष्ट्रातील राज्य संरक्षित स्मारकं अतिक्रमण मुक्त रहावी आणि त्यांची ऐतिहासिकता अबाधित रहावी याकरिता सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची नेमणूक करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

---------------------------------------------

**अमरावती/ चंद्रपूर महानगरपालिका**

राज्यातील सर्व महानगर पालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. अमरावतीत एकूण ६ लाख ७७ हजार १८० मतदार असल्याच त्यांनी सांगितल. अमरावती महानगरपालिकेसाठी ७ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून मतमोजणी दिनांक १६ जानेवारी रोजी नवसारी येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये होणार असल्याची माहिती आयुक्त शर्मा यांनी दिली. -

***(होल्ड बाईट - आयुक्त - सौम्या शर्मा - २५ सेकंद)***

***आपण वाटप केलेलं झोन आहेत त्या प्रत्येक झोन मध्ये एक रिटर्निंग ऑफिसर जे उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी आहेत कि आम्हाला विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत ते अधिकारी घेतले आहेत असे आपल्याकडे थेट आठ उपजिल्हाधिकारी संवर्गाचे अधिकारी आलेले आहेत. त्यापैकी सात रिटर्निंग ऑफिसर आणि हे आदर्श आचारसंहिता आहे त्याच्या नौदल प्रमुख असे आपण ठेवले आहे.***

दरम्यान चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अकुनुरी नरेश यांनी देखील काल पत्रकार परिषदे द्वारा आगामी निवडणुकीची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार चंद्रपूर महानगरपालिके अंतर्गत एकूण मतदारांची संख्या दोन लक्ष 99 हजार 994 इतकी असून एकूण दिव्यांग मतदार 807 आहेत. एकूण प्रभाग 17 असून उमेदवारांची संख्या 66 इतकी आहे ,तर मतदार केंद्रांची संख्या 355 इतकी असणार आहे.

---------------------------------------------

**अणु ऊर्जा विधेयक**

अणु ऊर्जा विधेयकावरच्या चर्चेला आज लोकसभेत प्रारंभ झाला. प्रस्तावित कायद्यामुळे २०४७ पर्यंत शंभर गिगावॉट अणु ऊर्जा निर्मितीचं लक्ष्य साध्य होईल, असं केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी विधेयक मांडताना सांगितलं. देशाच्या विकासात हा एक मैलाचा दगड ठरेल असं सिंह म्हणाले. तर, या विधेयकात पुरवठादाराचं दायित्व ठरवलं

नसल्याने देशासाठी हानीकारक असल्याचं सांगत,काँग्रेसचे मनिष तिवारी यांनी विधेयकाला विरोध केला.

---------------------------------------------

**काँग्रेस निदर्शन**

अंमलबजावणी संचालनालयाचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत आज काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधातल्या मनी लाँड्रिंग प्रकरणी ,आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीतल्या न्यायालयाने नकार दिला, या पार्श्वभूमीवर सोनिया गांधी आणि राहुल गांधींविरोधात केंद्र सरकार ईडीचा गैरवापर करत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला. काँग्रेस खासदारांनी संसद भवन परिसरात सरकारविरोधी घोषणाबाजी करत सरकारने गांधी कुटुंबाची माफी मागण्याची मागणी केली.

---------------------------------------------

**महालेखापरीक्षक आणि नियंत्रक**

कर अधिकाऱ्यांनी गुंतागुंतीच्या कर प्रकरणांना विवेकबुद्धी आणि कार्यतत्परतेन सामोर जाव आणि देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी आपल्या अनुभवाचा उपयोग करावा, अस आवाहन भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक के. संजय मूर्ती यांनी केलं. ते नागपूर येथील राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय महसूल सेवेच्या ७९व्या तुकडीच्या उद्घाटन समारंभात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी प्रधान आयकर आयुक्त मालती श्रीधरण आणि NADT चे महासंचालक एस. के. मॅथ्यूज उपस्थित होते.NADT ला क्षमता निर्माण आयोगाकडून मिळालेले पंचतारांकित मानांकन इतर शासकीय प्रशिक्षण संस्थांसाठी आदर्श ठरेल, अस महालेखापरीक्षक यावेळी म्हणाले. प्रशिक्षण संचालक सलील बिजूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार ७९ व्या तुकडीत १८२ अधिकारी असून त्यात भूतानमधील दोन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या तुकडीत ६७ टक्के महिला अधिकारी असून बहुसंख्य अधिकाऱ्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी अभियांत्रिकीची आहे. यावेळी प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना अकादमीचे अतिरिक्त महासंचालक सिधरामआप्पा कपट्टनवार यांनी कर प्रशासनाची शपथ दिली.

---------------------------------------------

**अटक वारंट**

राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी झालं आहे, अशी माहिती संबंधित तक्रारदाराचे वकील आशुतोष राठोड यांनी आज प्रसारमाध्यमांना दिली. त्यामुळं त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी राठोड यांनी केली. मुख्यमंत्री

स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून मिळवलेल्या चार सदनिकांच्या घोटाळ्याप्रकरणी माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार कोकाटे, आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं काल दोषी ठरवलं होतं.दरम्यान, याप्रकरणी कोकाटे यांचा राजीनामा घ्यायचा किंवा नाही हे अजित पवार ठरवतील, असं  राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी सांगितलं.

---------------------------------------------

**जी. राम. जी. अभियान**

लोकसभेत काल केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चव्हाण यांनी 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयक 2025' सादर केलं.  हे विधेयक वीस वर्षे जुन्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 ची जागा घेईल. ऐकूया याबाबत एक वृत्तांत

*(व्हॉइस कास्ट -हेमांगी कुळकर्णी )*

***ग्रामीण भागात व्यक्तीगत आणि सार्वजनिक मालमत्ता निर्माण व्हाव्यात आणि रोजगार निर्मिती व्हावी या प्रमुख उद्देशासह हे अभियान सुरु करण्यात आलं होत.  भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे जारी केलेल्या आकड्यानुसार 2014 ते 2025 या काळात या अभियानासाठी आठ लाख 53 हजार 810 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.  या अभियानांतर्गत 862 आवश्यक पायाभूत सुविधां आणि मालमत्तांची  निर्मिती करण्यात आली आहे.  सुमारे 12 कोटी श्रमिकांनी आधार द्वारे या अभियानात नोंदणी केली असून आजवर व्यक्तिगत 62.95 कोटी रुपयांची बांधकामे करण्यात आली आहेत.  या बांधकामांना अनेक ठिकाणी जिओ टॅगिंग केलं जातं आहे. हे आकडे ग्रामीण भागातील पारदर्शक आणि वेगवान विकासाचे प्रतीक आहेत.***

***आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी हेमांगी कुळकर्णी***

---------------------------------------------

**होमबाऊंड**

ऑस्कर २०२६ अर्थात ९८व्या अकॅडेमी पारितोषिकांसाठीच्या अंतिम फेरीत होमबाऊंड  हा भारतीय चित्रपट प्राथमिक फेरी पार करून निवडक  पंधरा चित्रपटांच्या यादीत पोचला आहे. नीरज घायवान दिग्दर्शित हा  भारतीय चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या श्रेणीत  आहे.  या यादीतल्या चित्रपटांचं अंतिम नामांकन २२ जानेवारीला जाहीर होईल. ९८वा अकादमी पुरस्कार सोहळा १५ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

---------------------------------------------

**खो खो**

६१ व्या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धांना उद्यापासून बीड इथं सुरुवात होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत पुरुष आणि महिलांचे प्रत्येकी २४ संघ सहभागी होणार असून यात ८०० खेळाडूंचा समावेश आहे. राज्यस्तरीय तसंच जिल्हास्तरीय खो-खो संघटनेच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

-----------------------------------------------

**ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातला चौथा ट्वेंटी ट्वेंटी क्रिकेट सामना आज संध्याकाळी ७ वाजता लखनऊ इथं खेळला जाणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत दोन सामने जिंकून आघाडीवर आहे.

-----------------------------------------------

**नितीन गडकरी**

टोलवसुली पद्धतीऐवजी स्वयंचलित नंबर प्लेट ओळख प्रणाली पुढल्या वर्षीपासून लागू केली जाईल, असं रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज राज्यसभेत सांगितलं. महामार्गावर वाहनांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी नवी प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**हवामान**

हवामान- विदर्भात गोंदिया इथं सातत्याने निचांकी तापमान नोंदवण्यात येत असून,आज देखील आठ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतकं सर्वात कमी ,किमान तापमान नोंदविण्यात आल . गोंदिया नंतर नागपूर इथं 9. 6, यवतमाळ आणि भंडारा इथं दहा, तर अमरावती इथं दहा पूर्णांक सहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भात थंडीची लाट कायम असून ,आगामी काही दिवस वातावरण कोरडे राहणार असल्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

-----------------------------------------------